**विशेष प्रसिद्धी मोहीम** १ ज्येष्ठ १९२८ शके (सायं.५.३०वा.)

लेख क्र. २ सोमवार, दि. २२ मे, २००६

## महाराष्ट्र : विदेशी गुंतवणुकीसाठी प्रथम पसंती

उदारीकरणाच्या धोरणामुळे आणि राज्य शासनाने निर्माण केलेल्या पोषक वातावरणामुळे राज्याचा औद्योगिक विकास झपाटयाने झाला. या औद्योगिक विकासामध्ये विदेशी थेट गुंतवणूकीचा वाटा मोलाचा आहे. ऑगस्ट १९९१ ते ऑगस्ट २००५ अखेर विदेशी थेट गुंतवणूकीअंतर्गत ५२, ८४० कोटी रुपये गुंतवणुकीचे ३,८३३ प्रकल्प राज्यात सुरु करण्यासाठी भारत सरकारने मंजूर केले आहेत. या प्रकल्पापैकी मे २००५ अखेर ३२,५३२ कोटी रुपये गुंतवणुकीच्या १,३७२ प्रकल्पांनी उत्पादनही सुरु केले आहे. थेट विदेशी गुंतवणुकीमध्ये २१ टक्के हिस्सा प्राप्त करुन महाराष्ट्राने त्याचे सर्वोच्च असलेले स्थान कायम राखले आहे.

महाराष्ट्रापाठोपाठ तामिळनाडू राज्याने २५,६२४ कोटी रुपयांची थेट गुंतवणूक मिळवून दुसरा क्रमांक मिळवला आहे. २०,५४४ कोटींची गुंतवणूक मिळवून गुजरात राज्य तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर त्यापाठोपाठ आंध्रप्रदेश आणि उत्तरप्रदेश या राज्यांचा क्रमांक असून त्यांनी मिळवलेली थेट गुंतवणूक अनुक्रमे १४,५४६ व ४,९४५ कोटी रुपयांची आहे.

प्राप्त झालेल्या विदेशी थेट गुंतवणूकीत सेवा उद्योग पहिल्या स्थानावर असून या उद्योगात १२,२७५ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. त्यापाठोपाठ माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात १०,८२४ कोटी, पायाभूत सुविधा क्षेत्रात ६,१४३ कोटी, मोटार वाहन क्षेत्रात ५,३३९ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. अभियांत्रिकी क्षेत्रात २,७१३, विद्युत व इंधन क्षेत्रात २,६९७, मूळ धातूक्षेत्रात २,३१९, रसायने व खते क्षेत्रात १,५३४, कागद उद्योगात १,३२२, वस्त्रोद्योगमध्ये १,०३६ व इतर सर्व मिळून साधारणतः ६,५०८ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.

थेट विदेशी गुंतवणूकीत महाराष्ट्राला पहिली पसंती मिळाली असली, तरी औद्योगिक गुंतवणूकीमध्ये महाराष्ट्र यावेळी दुसऱ्या स्थानावर गेला आहे. ऑक्टोबर २००५ अखेर राज्यात उद्योगांच्या उभारणीसाठी एकूण २,८५,१६८ कोटी रुपये गुंतवणूकीचे व २१.५५ लाख रोजगार क्षमतेचे १२,७०९ औद्योगिक प्रकल्प भारत सरकारकडे नोंदविण्यात आले आहेत. यापैकी जुन २००५ अखेर ९१,२०७ कोटी रुपये गुंतवणूकीच्या ५,७८१ प्रकल्पांनी प्रत्यक्षात उत्पादन सुरु केले असून, त्यातून अंदाजे ५.६३ लाख रोजगार निर्माण झाला आहे.

राज्यातील उद्योगांचा विकास व्हावा, म्हणून विविध प्रोत्साहनपर योजना राबविल्या जात आहेत. सामुहिक प्रोत्साहन योजनेखाली राज्याच्या मागास भागातील औद्योगिक घटकांना विद्युत, मुद्रांकशुल्कात माफी देण्यात आली आहे. नोंदणी तसेच जकात शुल्कात कर परतावा देण्याची व्यवस्था आहे. मागास भागात नवीन लघु उद्योग स्थापन व्हावेत, यासाठी अनुदानाच्या स्वरुपात विशेष भांडवल प्रोत्साहन योजना , नवीन वस्त्रोद्योग - होजिअरी व निटवेअर लघु उद्योगांसाठी व्याज अनुदान योजना राबविण्यात येत आहे. खादी व ग्रामोद्योगाला विक्रीकर भरण्यातून सूट देण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या उत्पादनावर किमान विक्रीकर व उलाढाल करात पूर्ण सूट देण्यात आली आहे. आजारी लघु उद्योगांना सुलभ हप्त्यात थकबाकीची परतफेड करण्याची मुभा देण्यात आली असून, माहिती तंत्रज्ञान घटकांसाठी वाढीव चटईक्षेत्र देण्यात आले आहे. राज्यात १२ विविध ठिकाणी स्वंयशासित औद्योगिक वसाहतींची स्थापना, अपारंपरिक

..२/-

ऊर्जाविकास , विशेष आर्थिक क्षेत्राची स्थापना, औद्योगिक वसाहतींमध्ये राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक व संशोधन संस्थांना सवलतीच्या दरात जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

पर्यावरणाचा समतोल राखत माहिती तंत्रज्ञान, उच्च तंत्रज्ञान , ज्ञानाधिष्ठित व जैव तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांना उत्तेजन देऊन उद्योगातील गुंतवणूक वाढविण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करीत आहे. शासनाने राज्यात दोन ठिकाणी आधीच विशेष आर्थिक क्षेत्रे विकसित केली असून त्याव्यतिरिक्त आणखी ६ ठिकाणी विशेष आर्थिक क्षेत्रांचा विकास करण्याचे निश्चित केले आहे. स्वंयशासित औद्योगिक वसाहतींची संख्या आणखी पाचने वाढविण्याचे राज्यशासनाने ठरवले असून राज्याच्या निर्यातीत वाढ व्हावी यादृष्टीने राज्यात कृषी निर्यात व इतर निर्यात क्षेत्र स्थापन करण्याचा प्रयत्न केला आहे. सीप्झ, द्रोणागिरी, बुटीबोरी, कागल-हातकणंगले, सिन्नर, शेंद्रा, गुहागर आणि खोपटा येथे विशेष आर्थिक क्षेत्रांचा विकास करण्यात येत आहे. हापूस, केशर आंबा, कांदा, द्राक्ष, संत्रा आदी फळपिकांसाठी कृषी निर्यात क्षेत्राची स्थापना करण्यात आली आहे. अलकुड मनेराजुरी जि. सांगली येथे फुड पार्क, तळेगाव दाभाडे येथे फ्लोरिकल्चर, तर नागपूर येथे ऑरेंज सिटी पार्क स्थापन करण्याचे निश्चित आहे. अंधेरी मुंबई व नवापूर नंदूरबार येथे जेम्स अँड ज्वेलरी पार्क, बुटीबोरी नागपूर व ऐरोली नवी मुंबई येथे टेक्सटाईल पार्क विकसित करण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्हयातील हुपरी येथे सिलव्हर पार्क स्थापन करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, अहमदनगर, सातारा, अलिबाग, लातूर व अमरावती या जिल्हयात २७ सार्वजनिक व १४६ खाजगी माहिती तंत्रज्ञान पार्क विकसित करण्यात येत आहेत.

जनतेला उत्तम सुविधा पुरविणे, सेवा क्षमतेत वाढ करुन राज्य महसुलात वाढ करण्यासाठी व प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी ई-गव्हर्नन्स धोरण अंमलात आणले आहे. त्यानुसार २७ जिल्हयांमधील ३०६ तालुक्यांच्या ठिकाणी सेतू या नावाने नागरी सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. याद्वारे विविध ८३ प्रकारचे दाखले नागरिकांना उपलब्ध करुन दिले जात आहेत. पथदर्शी स्वरुपात ५० ठिकाणी आय सेतू नावाचा प्रकल्प राबविण्याचा राज्यशासन विचार करीत असून, राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालये व जिल्हाधिकारी कार्यालये व्ही सॅट यंत्रणेद्वारे मंत्रालयाशी जोडण्यात आले आहेत. याद्वारे व्हिडिओ कॉन्फरसिंग आणि माहितीची देवाणघेवाण सुरु आहे.

राज्यातून प्रामुख्याने हिरे व आभुषणे , संगणक प्रणाली, तयार कपडे, सुती धागे, कृत्रिम धागे, यंत्रसामग्री व उपकरणे, धातू व धातू उत्पादने व कृषी उत्पादने यांची निर्यात होते.सन २००४-०५ मध्ये राज्यात झालेली निर्यात १,९३,८३२ कोटी रुपयांची असून, भारताच्या एकूण निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा हिस्सा ४५ टक्के इतका होता.

उद्योग विकासासाठी आवश्यक असलेल्या पोषक वातावरणाची उपलब्धता व राबविण्यात येत असलेल्या वैविध्यपूर्ण योजना यामुळे महाराष्ट्राला थेट गुंतवणूकीसाठी देशात पहिली पसंती मिळाली आहे. त्याप्रमाणेच औद्योगिक गुंतवणूकीतही महाराष्ट्र अग्रक्रमावर राहील आणि राज्य पुन्हा एकदा उद्योग क्षेत्रात देशाचा मुकूटमणी होण्याचा बहुमान मिळवेल, असा विश्वास वाटतो.

- डॉ. सुरेखा मुळे

०००